**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ५०/२०२५</u>**
**<u>मधील अर्ज निशाणी क्र.३८ खालील आदेश</u>**
**<u>(CNR- MHWS050002972025)</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी, मंडळअधिकारी यांनी श्रीकांत विनोद गावंडे आणि प्रशांत विनोद गावंडे यांना दिलेल्या नोटीस ची अस्सल प्रत, अरुण सुडके यांचा तहसिलदार यांच्याकडील अर्ज, मंडळअधिकारी व तलाठी यांचा संयुक्त अहवाल, लेखीजबाब, तहसिलदार मंगरुळपीर आणि उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या आदेशाच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. प्रतिवादी क्र. ४ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. वादी यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एन.एम. मुळे यांचा आणि प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. जी.व्ही. बियाणी यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दाखल करु इच्छित असलेल्या मंडळअधिकारी यांनी श्रीकांत विनोद गावंडे आणि प्रशांत विनोद गावंडे यांना दिलेल्या नोटीस ची अस्सल प्रत, अरुण सुडके यांचा तहसिलदार यांच्याकडील अर्ज, मंडळअधिकारी व तलाठी यांचा संयुक्त अहवाल, लेखीजबाब, तहसिलदार मंगरुळपीर आणि उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या आदेशाच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :-**

३. वादी यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा दावा वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबीत असून वादी हे त्यांच्या पुराव्याच्या अनुषंगाने मंडळअधिकारी यांनी श्रीकांत विनोद गावंडे आणि प्रशांत विनोद गावंडे यांना दिलेल्या नोटीस ची अस्सल प्रत, अरुण सुडके यांचा तहसिलदार यांच्याकडील अर्ज, मंडळअधिकारी व तलाठी यांचा संयुक्त अहवाल, लेखीजबाब, तहसिलदार मंगरुळपीर आणि उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या आदेशाच्या प्रमाणित प्रती दाखल करु इच्छीत आहेत. तरी, त्या प्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादींनी ती कागदपत्रे उशीराने दाखल केली आहेत त्यामुळे ती कागदपत्रे दाखल करण्यास प्रतिवादी क्र. ४ यांची हरकत आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी यांनी प्रस्तूतचा दावा जाहिर ठरावासाठी आणि कायम मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी आणि प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचा लेखी जबाब हा विचारात घेवून दिनांक २१.६.२०२५ रोजी निशाणी क्र. ३५ अन्वये मुद्दे काढलेले आहेत. प्रस्तुतचा दावा हा वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. वादी हे मंडळअधिकारी यांनी श्रीकांत विनोद गावंडे आणि प्रशांत विनोद गावंडे यांना दिलेल्या नोटीस ची अस्सल प्रत, अरुण सुडके यांचा तहसिलदार यांच्याकडील अर्ज, मंडळअधिकारी व तलाठी यांचा संयुक्त अहवाल, लेखीजबाब, तहसिलदार मंगरुळपीर आणि उपविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या आदेशाच्या प्रमाणित प्रती दाखल करु इच्छीत आहेत. त्या अस्सल व प्रमाणित प्रती अभिलेखावर आल्या तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यास त्या प्रती उपयुक्त होवू शकतात. त्यामुळे वादी यांच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर उपरोक्त दस्त अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि वादी यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश

पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ३८ मंजुर करण्यात येत आहे आणि वादी यांना उपरोक्त अस्सल व प्रमाणित प्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.10.17 11:58:00 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : १७.१०.२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 17/10/2025 |
| Order signed by the P.O. on | : | 17/10/2025 |
| Order uploaded on | : | 17/10/2025 |